रे. फौजदारी खटला क्र. **२४४/२०२३**
सरकार विरूद्ध निखील व अन्य एक
**निशाणी १८**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ ची जबानी**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

माझे नाव : सुभाष प्रभुदास गौर

वय : ५७ वर्षे,

धंदा : मजुरी,

राहणार : टाकपुरा, अकोट, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. ओ. गाडेकर यांचेमार्फत —**

मी आरोपींना ओळखतो. फिर्यादी माझी मुलगी आहे. आरोपी क्र. १ फिर्यादीचा पती असुन, आरोपी क्र. २ हा आरोपी क्र. १ चा चुलत भाउ आहे. घटना दि. २९/०७/२०२३ रोजी रात्री ११:०० वाजता घडली. सदर वेळी मी माझे घराच्या बाहेर होतो. माझे घरच्या लोकांना मारठोक होत असतांना मी त्यांना सोडवण्यासाठी आलो होतो. मी सोडवा—सोडव करत असतांना आरोपी क्र. २ याने मला रॉड मारला होता. रॉड लागल्यानंतर दहा मिनिटांनी मी घटनास्थळावर चक्कर येवुन पडलो. मला लोकांनी ग्रामीण रूग्णालयात उपचारासाठी आणले होते. पोलीसांनी माझे बयाण अकोला येथे घेतले होते. मला ज्या रॉडने आरोपी क्र. २ ने मारले तो मला दाखवल्या मी ओळखु शकतो. आता मला मुद्देमाल वस्तु ‘अ’ एक लोखंडी रॉड दाखवला. साक्षीदार पाहुन सांगतो की, याच रॉडने मला आरोपी क्र. २ ने मारले होते. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी** — दोन्ही आरोपीतर्फे ॲड. श्री. एस. जी. कुळकर्णी यांचे मार्फत.

२. पोलीसांनी घटनेच्या दुस—या दिवशी माझे बयाण नोंदवले होते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व आरोपी क्र. १ यांची आपसांत पटत नसल्यामुळे फिर्यादी दि. १०/०६/२०२३ पासुन माझेकडे माहेरी राहत आहे. घटनास्थळापासुन माझे घर २०० ते २५० फुट लांब अंतरावर आहे. मी घटनास्थळावर १०:४५ वाजता पोहोचलो. हे म्हणणे खरे नाही की, माझी मुलगी वैष्णवी व आरोपी क्र. १ हे जिजा—साली या नात्याने आपसांत थट्टा—मस्करी करत असे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे फिर्यादी आरोपी क्र. १ च्या चारित्र्यावर संशय घेत असे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने वैष्णवीच्या सहाय्याने आरोपी क्र. १ विरूध्द खोटी पोक्सोची केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने मला आरोपींबाबत उलट—सुलट सांगितल्याने मी आरोपींशी भांडण केले. हे म्हणणे खरे नाही की, मी, माझा मुलगा गौरव, माझी पत्नी पुष्पा, फिर्यादी व वैष्णवी असे

मिळुन आम्ही आरोपीला शिवीगाळ व लोटा—लोट केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ हा घटनास्थळी भांडण सोडवण्यासाठी आला असता, आम्ही त्याला देखील मारले. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ कडे बोलेरो पिकअप मालवाहु गाडी आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेदिवशी आम्ही सर्वांनी मिळुन आरोपी क्र. १चा गाडीला दगडं मारून तिची तोडफोड केली. हे म्हणणे खरे नाही की, भांडणादरम्यान मी सदर गाडीच्या पुढील लोखंडी रॉडवर पडलो व त्यामुळे मला दुखापत झाली.

३. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ ने मला मुद्देमाल वस्तु क्र. 'अ' रॉड मारला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने आमच्याविरूध्द तक्रार करू नये म्हणुन आम्ही आरोपींविरूध्द प्रस्तुत खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेवेळी घटनास्थळाजवळ लोकांची ये—जा चालु होती. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, घटनास्थळाजवळ माझे घर आहे व रात्रीच्या वेळेस तिकडे कोणीही ये—जा करत नाही.

४. मला मार लागल्याने माझे रक्त माझे कपड्यांवर पडले होते. सदर कपडे पोलीसांनी ताब्यात घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीला आरोपी क्र. १ सोबत राहावयाचे नाही व फारकत घ्यावयाची आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व त्याचे परिवारासोबत आमचे पटत नसल्यामुळे मी आरोपींविरूध्द खोटी साक्ष देत आहे.

५. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात नमुद केल्याप्रमाणे कुठलीही घ टना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. **उलटतपास पुर्ण.**

**फेरतपासणी** — काही नाही.

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**
(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.

दि. ११.०७.२०२५
अकोट

**RCC No. 244/2023**
**Evidence/Exh. 18**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F file Evidence are same word to word as per the original evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | P. N. DURATKAR |
| Court Name | : | 2nd Joint Civil Judge (Jr.Dn.) & JMFC, Akot, Tq. Akot, Dist. Akola |
| Date of decision | : | 11/07/2025. |
| Evidence Signed by P.O on | : | 11/07/2025. |
| Evidence Uploaded on | : | 11/07/2025. |